# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८ ऑगस्ट २००९ (का.प.क्र.३१) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक १८/०८/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.५.०० वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.सौ.विजयाताई बनकर
१२. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१३. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१४. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१५. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१६. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१७. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
१८. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
१९. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२०. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२१. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२२. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
२३. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२४. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२५. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
२६. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
२७. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
२८. स.स.श्री.खान निसार मोहम्मद खान
२९. स.स.सौ.राऊत छाया विलास
३०. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
३१. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
३२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष

३३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३४. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
३५. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
३६. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
३७. स.स.श्री.त्र्यबंक तुपे
३८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
३९. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४०. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
४१. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४२. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४३. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
४४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
४५. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
४६. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
४७. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
४८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
४९. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५०. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
५१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५२. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
५३. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५४. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
५५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
५६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
५७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
५९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६०. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
६१. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
६२. स.स.श्री.विनोद सोनवणे

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**<u>चर्चा :</u>**

श्री.मो.जावेद मो.इसहाक :बजेट बुक केंव्हा तयार होणार अंदाजपत्रक व त्यानुसार विकास कामे केंव्हा होणार

मा.महापौर :बजेट फायनल झालेले आहे छपाईसाठी दिले ३-४ दिवसात येण्याची अपेक्षा आहे.

**<u>विषय क्र. ५७२ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, केंद्र व राज्य शासनाकडून नागरी भागातील सोयी सुविधा करीता विविध योजनांमधून शासकीय अनुदान

महानगरपालिकेस अपेक्षीत असते. अशी अनुदाने प्राप्त करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे विहीत केली आहेत. त्यानुसार महानगरपालिकेस विविध सुधारणा करण्यास सांगितले जाते. यापैकी एक अनिवार्य मुख्य सुधारणा म्हणजे कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण. या कामी औरंगाबाद महानगरपालिकेने पुढाकार घेऊन,

अ) निविदा प्रक्रियेंचे संपूर्ण संगणकीकरण करून निविदा प्रक्रिया Online केली आहे.त्यामूळे निविदांची विक्री, निविदा दाखल करणे व निविदा उघडणे आदी प्रक्रिया Online करण्यात आल्या आहेत.

ब) औरंगाबाद महानगरपालिकेच्या संगणकीकरणासाठी ERP Solution [Enterprise Resource Planning Base Solution] योजना अंमलात आणण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९१/११ दिनांक ११.०८.२००६ नुसार मान्यता झाली. निविदा प्रक्रिये अंती SAP ह्या संगणकीय प्रणालीची निवड महानगरपालिकेने केली असून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गरजेनुसार SAP Software Customization & Implementation ची जबाबदारी M/s CMC Ltd. या यंत्रणेस दिलेली आहे. या कामासाठी रूपये २ कोटी + Service Tax असा खर्च अपेक्षित आहे. ह्या मध्ये लेखा,अस्थापना, मालमत्ता व अभियांत्रिकी विभाग या चार मुख्य विभागाचे संगणकीकरण करण्याचे नियोजीत आहे. प्रत्यक्ष कामास जुलै २००७ पासून सुरूवात झाली होती व दिनांक २५.०६.२००९ रोजी संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आली आहे. व नियमीत सरावाने संगणकीय कार्यप्रणालीवरून सुरळीत कामकाजास सुरूवात होईल अशी अशा आहे.

या कामासाठी आवश्यक संगणकीय साहित्य औरंगाबाद महानगरपालिकेने यापूर्वीच घेतले असून त्यासाठी सुमारे ९२ लक्ष रूपये खर्च केले आहेत व संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी आतापर्यंत सुमारे रू.१२५ लक्ष खर्च झालेला आहे व Networking चे कामही पूर्णत्वाकडे आहे.

उक्त नमूद विभागा बरोबरच महानगरपालिकेतील इतर सर्व विभाग एकाच संगणकीय कार्यप्रणालीवर कार्यान्वीत करण्याचा औरंगाबाद महानगरपालिकेचा मनोदय आहे. त्यासाठी Customization,Hardware Up gradation व SAP User Licenses साठी भरीवतरतूद करावी लागणार आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने संगणकीय प्रणाली विकसित करणेसाठी घेतलेला पुढाकार व शासनाचे धोरण या बाबींचा विचार करून औरंगाबाद महानगरपालिकेस संपूर्ण संगणकीकरण करण्यासाठी रूपये १५.०० कोटीचे शासकीय अनुदान प्राप्त करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे मागणी करणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा :ईआरपी कार्यान्वित झाले प्रशासनाचे म्हणणे आहे परंतु एकाही विभागाने उपयोग केला नाही ईआरपी सीस्टम पूर्ण करण्यासाठी एकूण खर्च किती स्थायी समितीत मध्ये २ कोटी सांगण्यात आले प्रस्ताव हा १५ कोटी चा आहे. ईआरपीचा वापर केंव्हापासून करणार जे करणार नाही त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे

श्री.रेणुकादास वैद्य :मी सभापती असतांना ईआरपी चे कामासाठी २.१० कोटीस मंजूरी दिली होती खर्च केल्यानंतर काय विनियोग केलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :पूर्ण कामासाठी १५ कोटीचा प्रस्ताव आहे शासनास पाठविणार २.१० कोटीत किती ,कोणत्या कामासाठी खर्च केले माहिती दयावी. ०२ वर्षे संपलेली आहेत.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) :४ विभागात ईआरपीचे काम कार्यरत होतील,अर्थसंकल्प त्यावर लोड होणार नंतर काम सुरू होईल.इतर विभागासाठी ही प्रणाली कार्यान्वित करायची आहे त्यासाठी १५ कोटीची मागणी शासनाकडून करणार तसा हा प्रस्ताव ठेवला त्यासाठी १५ कोटी खर्च लागणार आहे.

मा.महापौर :अर्थसंकल्पात या बाबतीतीचे कोणते काम बाकी आहे.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : जे अंदाजपत्रक,टेंडर वगैरे काढायचे ते अर्थसंकल्प अंतिम होत नाही तोपर्यंत थांबून राहतील. अर्थसकल्प ईआरपी मध्ये लोड झाला पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :२.१० कोटी खर्चास दोन वर्षापूर्वी मंजूरी दिली ही पुर्ण रक्कम खर्च झाली का, झाली नसेल तर का झाली नाही.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड):रू १.२५ कोटी खर्च हे ४ विभागामध्ये जे संगणकीकरण केले त्यावर खर्च झाले. आज कार्यान्वित आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :संगणकीकरण म्हणजे नेमके काय केले कॉम्प्युटर देवून कार्यान्वित झाले का? ऑनलाईन झाले का.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : ४ विभाग आज ईआरपीने कार्यान्वित झालेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :टेंडरनुसार कोणकोणते काम होणे अपेक्षीत होते झोन कार्यालयास कनेक्शन आहे.याठरावानुसार आता किती विभागाचे काम करणार आहे

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) :२.१०कोटीचे ईआरपीसाठी टेंडर होते त्यात टेक्नीकल,झोन कार्यालय,मालमत्ता विभाग व लेखा विभाग ४ विभागात काम केले. सॅप सॉफ्टवेअर केले. ४ विभागात चालवायचे आहे.

श्री.प्रशांत देसरडा :झोनला ईआरपी नुसार कार्यवाही होत नाही.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) :अर्थसंकल्प जेव्हा लोड होईल त्यावेळी सर्व ठिकाणी ईआरपी नुसार कामास सुरूवात होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :२.१० कोटीमधील ईआरपीची काय होती ती कामे झाली का?

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : २.१० कोटीत चार विभागाचे संगणकीकरण करणेचे काम होते ती कामे पुर्ण झाली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : २.१० कोटीमध्ये संगणकीकरण नव्हते तर पूर्ण सिस्टम ऑनलाईन करणे असे आहे.ते होण्यासाठी काय खरेदी केले.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : सॉप्टवेअर खरेदी केले सॉप्टवेअरवर ४ विभागाचे संगणकीकरण चालू आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मालमत्ता व इतर सर्व ४ विभागास संगणक दिले का?

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : नवीन संगणक दिले आहे.

मालमत्ता अधिकारी :मालमत्ता विभागास संगणक दिले कनेक्शन दिले नाही.त्यावर मास्टर डाटा लोड करण्याचे बाकी आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : संगणक आणून ठेवणे म्हणून ईआरपीनुसार काम झाले असे नाही.

श्री.भगवान घडमोडे : १.२५ कोटी खर्च झाले संगणक दिले कनेक्शन नाही ऑनलाईन काय झाले मालमत्ताचे १ ही टेंडर आतापर्यत ऑनलाईन झाले नाही. स्थायी समितीत दुकाने किती माहिती देता आली नाही २.१० कोटीला २००७ मध्ये मंजूरी दिली ईआरपी ऑनलाईन झाले नाही अशी परीस्थिती असेल तर १५ कोटीची ईआरपीची कामे केंव्हा होतील.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : ४ विभाग संगणकीकरणावर जोडले गेले आहे.

मा.महापौर : संगणकीकरणावर जोडणे म्हणजे त्या विभागात ऑनलाईन नुसार काम होणे.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : टेक्नीकल व लेखा विभागास थोडी अडचण आहे अर्थसंकल्प झाल्यानंतर त्यावर लोड होतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ऑपरेट करणारे कर्मचारी आहेत का

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : कंपनीचे कर्मचारी आहे. ६ वेळेस प्रशिक्षण दिले आहे. या वर्षीपासून वापर सुरू होईल.

मा.महापौर : ४ विभागात ईआरपीचे काम पुर्ण झाले असे म्हटले होते त्यास २ महिणे झाले किती काम केले प्रत्येक विभागाची माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य आतापर्यत किती संचिका स्कॅनींग म्हणजे लोड केल्या अशा संचिका प्रशासनाला ऑनलाईनवर बघता येईल का?

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : ईआरपी नुसार संगणकावर लोड केलेल्या संचिका बघू शकतील कनेक्शन देणे हे नॉरमल काम आहे लवकरच कार्यवाही होईल.

श्री.भगवान घडमोडे कनेक्शन नाही म्हणून ईआरपी ऑनलाईन चालू झाले नाही माहिती लोड केली असती तर आता देता आली असती किती मालमत्ता आहे आजही अधिकारी उत्तर देवू शकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य संचिकेचे स्कॅनींगच नाही तर संचिका लोड होवू शकत नाही चुकीची माहिती देवू नये.

मा.महापौर :सॉप्टवेअर व इतर खरेदी केले कस्टमॉईजेशन झाले असेल प्रत्यक्षात त्याचे इम्प्लीटेशन होते का त्यासाठी लागणारे हार्डवेअर प्रोव्हाईड केले का, केले असेल तर सर्व विभागात ते दिले का, मालमत्ता विभागात एक संगणक व त्यास कनेक्श्न दिले नाही एक संगणकावर या विभागाचे काम भागेल का? मालमत्ता विभागाचे आतापर्यत संगणकावर काय काम केले खुलासा करावा.

श्री.रेणूकादास वैद्य संचिका स्कॅनींग नाही संगणकीकरण झाले माहिती उपलब्ध होवू शकते असे उत्तर चुकीचे आहे.

श्री.प्रशांत देसरडा :इतर महापालिकेने नांदेड व नागपुर महानगरपालिकेने येथील ईआरपी सिस्टीम घेणेसाठी विचारणा केली काय २०टक्के त्यातून महापालिकेला रॉयल्टी मिळणार आहे सिस्टम चालू झाले असते तर महापालिकेकडे रक्कम जमा झाली असती.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : दोन महापालिकेने माहिती मागविली आहे.

मा.महापौर : चांगली यत्रंणा आहे म्हणून इतर महापालिका जर विचारणा करीत असेल तर आपली नक्कीच जबाबदारी वाढली असे वाटत नाही का?

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : ४ विभागामध्ये लगेच काम सुरू होणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :विकास कामे सोडून या कामासाठी २ कोटी खर्च केले अमलबजावणी होत नाही ज्या विभागात दिले त्यांनी काय काम केले खुलासा घ्यावा.

श्री.एम.डी.सोनवणे का.अ.(अ,ड) : काम होण्यास उशीर झाला मान्य आहे परंतु आता प्रोसेस पूर्ण झाली आहे काम लवकरच सुरू होईल.

मा.महापौर :ईआरपी इम्प्लीमेंन्ट होण्यासाठी ४ ही विभागाने आतापर्यत काय काम केले प्रत्येक विभाग प्रमुखाने खुलासा करावा.

श्री.सलीम पटेल :टेक्नीकल विभागात कोणत्या पध्दतीने काम चालते खुलासा घ्यावा संचिका शोधाव्या लागतात.

श्री.सतीष कटकटे :३ वर्षात २.१० कोटी खर्च केले १५ कोटीचा प्रस्ताव ठेवला पूढील ३ वर्ष २०१२ पर्यत किती रक्कम खर्च होणार आहे.

श्री.संतोष खेंडके : ऑनलाईन झाले असते तर संचिका एक दुसऱ्या विभागात घेवून जाण्याची वेळ सदस्यावर आली नसती.

सहा.आयुक्त-२ :या विभागाशी संबधीत असलेले सर्व कर्मचाऱ्यांची माहिती त्याचे पेस्लीपमध्ये दर्शविलेला पगार त्यांची कुटूंबातील माहिती त्यांचे वय पात्रता रजा शिल्लकीच्या नोदी नियुक्तीची तारीख या बाबतीत सर्व माहिती संकलीत करण्याचे काम सुरू झाले.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :संगणक सुरू केले असेल तर माहिती लोड का केली नाही. |
| सहा.आयुक्त-२ | :सर्व कर्मचा-यांची माहिती मास्टर डाटा संगणकावर लोड करण्यासाठी तयार करून ठेवला आहे.या विभागास अदयाप संगणक मिळाले नाही. |
| सहा.आयुक्त-१ | : या विभागाची संपूर्ण माहिती ईआरपीवर लोड झाली पुर्ण कनेक्शन या विभागात दिले आहे.प्रोसेस सुरू केल्यानंतर ऑनलाईन सर्वच कर्मचा-याची माहिती मिळू शकेल.कनेक्शन दिलेले आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :ग्रामीण भागात ऑनलाईनवर काम चालते दोन वर्षात महापालिकेत या बाबत कार्यवाही होत नाही खेद वाटते होत नव्हते तर कशासाठी कार्यवाही केली. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :एजन्सीला काम दिले होते सॉप्टवेअर वगैरे सर्व उपलब्ध झाले परंतु दुर्लक्ष केले कार्यान्वित झाली नाही.ही सर्व सिस्टम चालू करण्यास ८ दिवस पुरे होतात. |
| मा.महापौर | : ही योजना चांगली होती. तत्कालीन आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांनी हा प्रस्ताव केला होता सर्वच ठिकाणी शासनाच्या विविध योजनाच्या माध्यमातून निधी मिळविण्यासाठी कम्प्लसरी केले.योजना चांगली असून ईआरपीने काम करायचे होते ते केले परंतु पुढील इम्प्लीमेन्ट झाले नाही त्यामूळे बदनामी होवू शकते. ईआरपीचे कामाबध्दल इतर महानगरपालिका माहिती मागते त्यावर २० टक्के रॉयल्टी मिळू शकते इतके चांगले काम झाले परंतु केवळ यांचे इम्प्लीमेन्ट करण्याची इच्छा अधिकाऱ्यांची नाही असे एकदरीत दिसते. येत्या ८ दिवसात ईआरपीचा वापर सुरू व्हावा यासाठी प्रशासनाने काळजी घ्यावी हार्डवेअर घेणे आवश्यक असेल ते घ्यावे एवढे करून जर इम्प्लीमेंन्ट होत नसेल तर संबधीतावर कडक कार्यवाही करावी. |
| श्री.संतोष जेजुरकर | : एलसीडी आले,फ्लॅट स्क्रीन आले,आपण अद्यापही मोठेमोठे का घेतो. |
| श्री.संतोष खेंडके | :या संबधी आयुक्तांचा खुलासा घ्यावा. |
| मा.आयुक्त | : विषय महत्वाचा असून काम आवश्यक आहे. सुरूवात चांगली झाली होती रेंगाळलेले काम आहे.४ ही विभागात अदयाप ऑनलाईन झालेले नाही. यासंबधी कार्यवाही होईल. परंतु महापालिकेच्या सर्व विभागात कार्यवाही होणेसाठी ई- गव्हर्नन्स म्हणून ऑनलाईन करण्याची गरज आहे जो प्रस्ताव ठेवला त्यास मान्यता दयावी. |
| मा.महापौर | :४ विभागात त्वरेने ऑनलाईन होईल याची कार्यवाही करावी विषय मंजूर करण्यात येतो. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिकेने संगणकीय प्रणाली विकसित करणे साठी घेतलेला पुढाकार व शासनाचे धोरण या बाबींचा विचार करून औरंगाबाद महानगरपालिकेस संपूर्ण संगणकीकरण करण्यासाठी रूपये १५.०० कोटीचे शासकीय अनुदान प्राप्त करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे मागणी करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५७३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद रेल्वेस्टेशन येथील रेल्वे क्रॉसींग ते बीड बायपास पैठणरोड येथील रस्ता जून्या विकास योजनेनुसार ३०.०० मीटर रूंदीचा प्रस्तावित होता. प्रत्यक्ष जागेवर बहुतांश रस्ता ३०.०० मीटर रूंद निश्चित केलेला असून रेल्वे लाईन क्रॉसींगवर फ्लाय ओव्हर ब्रीज बांधण्यात आलेला आहे. व फ्लाय ओव्हरच्या दोन्ही बाजूंस सर्व्हीस रोड अस्तित्वात आहे.

औरंगाबाद शहराच्या (सुधारीत) मंजूर विकास योजनेनुसार उक्त रस्ता ४०.०० मीटर रूंद प्रस्तावित करण्यात आलेला आहे. अस्तित्वातील ३०.०० मीटर रस्त्याच्या रूंदीकरण प्रस्तावित करून उक्त रस्ता ४०.०० मीटर रूंद प्रस्तावित करण्यात आलेला आहे. कारण फ्लाय ओव्हर ब्रीजच्या दोनही बाजूला सर्व्हीस रोडवरून वाहने जातात व सदर सर्व्हीस रोड अरूंद असल्याने वाहतूकीस अडथळा होवून अपघात होण्याची शक्यता असल्याने तेथील नागरीकांची व स.नगरसेविका यांनी रूंदी करण्याची मागणी आहे.

करीता रेल्वे स्टेशन येथील रेल्वे क्रॉसींग ते बीड बायपास पैठणरोड पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने ४०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्र संपादीत करावयाचे आहे. त्यामध्ये अंदाजे २० मालमत्ता बाधीत होत असून बाधीत क्षेत्र अंदाजे ६०००.०० चौ.मी.आहे. संयुक्त मोजणीमध्ये त्यात बदल होण्याची शक्यता आहे.

करीता वरीलप्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.महापौर | :या प्रस्तावाची संबधीत अधिकारी यांनी माहिती दयावी. |
| प्र.सहा.संचालक(न.र) | : रेल्वेस्टेशन ते बीडबायपास रोडपर्यत रेल्वे ब्रीजच्या खाली ३० मी. रोड आहे डीपी रोडमध्ये पुर्वी तो ३० मीटरचा होता आता ४० मीटरचा झाला.कमी जास्त रूंदीचा रस्ता झाला दोन्ही साईडने काही ठिकाणी ५ मी.जागा भुसपांदीत करण्यासाठी खर्चाचा प्रस्ताव आहे.हा रस्ता महापालिकेचा आहे. |
| सौ.लता दलाल | :टीडीआर घेत असेल तर दयावे. |
| सहा.संचालक (न.र.) | :टीडीआर व एफएसआय ची कार्यवाही कम्प्लसरी करता येत नाही भुसंपादनाची कार्यवाही नोंटीस वगैरे देतो त्यावेळेस संबधीत व्यक्तीनी TDR किंवा FSI ची मागणी केली तर कार्यवाही करता येईल. |
| श्री.सतीष कटकटे | :आयुक्त श्री. बंड साहेब यांनी काही रस्त्याचे रूदीकरण केले ३० मी. चा रस्ता ४० मी. केला त्यात काही लोकांच्या जागा भुसंपादीत केल्या त्यांना अदयाप मोबदला दिला नाही ही रक्कम कोठून देणार आहे. |
| सौ.लता दलाल | :यापूर्वीच्या बैठकीत असाच एक प्रस्ताव मंजूर केला टीडीआर किंवा एफएसआय घेणार असेल तर मंजूर करण्यास हरकत नाही. |
| मा.महापौर | : या विषयामध्ये काही जागा महापालिकेची आहे का हे तपासून घ्यावे हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही. पण एफएसआय किंवा टीडीआर आताच म्हटले की, शासनाकडे १०० कोटी रूपयाची मागणी केली. महापालिकेकडे पैसे नसल्यामूळे याही पर्यायाचा अवलंब करावा. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वे स्टेशन येथील रेल्वे क्रॉसींग ते बीड बायपास पैठणरोड पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने ४०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्र संपादीत करणेस तसेच या विषयामध्ये काही जागा महापालिकेची आहे का हे तपासून घ्यावे एफएसआय किंवा टीडीआर या पर्यायाचा यात अवलंब करावा यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७४ :**

आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका प्राणिसंग्रहालयात असलेल्या प्राण्यांना जागा कमी पडत असुन त्यांच्या नैसर्गीक हालचालींवर बंधने येत आहेत.त्यामुळे प्राणिसंग्रहालय प्रशस्त जागेत स्थलांतरीत करणे बाबत केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधीकरण्याच्या सुचना आहेत.त्यानुसार शहराच्या बाहेर योग्य जागेची पाहणी करून जागा उपलब्ध करून घेणसाठी प्रयत्न करण्यात आले.परंतु या प्रक्रियेस बराच कालावधी लागणार असल्याने व या प्राणिसंग्रहालयास

दिनांक ३०/४/२०१० पर्यंत केंद्रिय प्राणिसंग्रहालयाची मान्यता असुन तो पर्यंत योग्य जागेबाबत निर्णय होणे आवश्यक असल्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या प्राणीसंग्रहालयाच्या लगतची महानगरपालिकेची सिध्दार्थ उद्यानातील जागा प्राणिसंग्रहालयाकरीता वाढवून नवीन पिंजरे बांधणे योग्य राहील.

प्राणिसंग्रहालयातील खंदक (मोट)असलेल्या पिंजऱ्यातील वाघ,सिंह,हत्ती हे प्राणी ठेवण्यासाठी प्राणिसंग्रहालयास किमान १० हेक्टर पेक्षा जास्त जागा असावी असे केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधीकरणाचे निर्देश आहेत.

सध्या प्राणिसंग्रहालय (०६)हेक्टर जागेत असून सिध्दार्थ उद्यान (०८)हेक्टर जागेत आहे.दोन्ही मिळुन एकूण जागा (१४)हेक्टर आहे.प्राणिसंग्रहालय व सिध्दार्थ उद्यान एकत्र करून सर्वच एकूण १४ हेक्टर जागा प्राणिसंग्रहालयाच्या बृहत आराखड्यासाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे.परंतु सिध्दार्थ उद्यानाचा उद्देश व वापर न बदलता संरक्षित भिंतीच्या दोन्ही बाजुला प्राण्यांचे व पक्षांचे काही पिंजरे आराखड्यात दर्शविता येतील.आणि परीसरास **"सिध्दार्थ् उद्यान प्राणिसंग्रहालय"**असे संबोधण्यात येईल.त्यामुळे प्राणिसंग्रहालयाचा प्रलंबीत राहीलेला बृहत आराखडा तयार करता येईल व केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधीकरणाकडुन आराखडा मंजुर करून घेण्यात येईल व त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.  त्यामुळे प्राणिसंग्रहालयाची मान्यता पूढे अबाधित राहील.

करीता प्राणिसंग्रहालयासाठी केंद्रिय प्राणिसंग्रहालयाचे मानकानुसार जागा वाढविणे,याजागेवर प्राणिसंग्रहालयाचा बृहत आराखडा तयार करणे व बृहत आराखडा सेंट्रल झु ऑथरिटीकडुन मान्य झाल्यावर त्यानुसार अंमलबजावणी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेस सादर.

**प्रस्तावा सोबतची सविस्तर खुलासा टिप्पणी :-**

**"सेंट्रल झु ऑथरिटी नवी यांच्या मार्गदर्शक सुचना अन्वये महानगरपालिका प्राणिसंग्रहालयातील आपुऱ्या जागेमुळे प्राण्यांच्या नैसर्गीक हालचालींवर बंधने येत असल्याने प्राणिसंगहालयासाठी जागा वाढवणे व प्राणिसंग्रहालयाचा सुधारीत मास्टर प्लॅन तयार करणे बाबत मा.सभागृहात चर्चा होऊन निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव."**

प्रस्तावाबाबत सविस्तर खुलासा करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेचे प्राणिसंग्रहालय हे सिध्दार्थ उद्यान येथे सन १९८५ पासुन कार्यरत असून या प्राणिसंग्रहालयासाठी सिध्दार्थ उद्यानातील ३७ एकर जागेपैकी १४ एकर जागेवर प्राणिसंग्रहालयाची उभारणी करण्यात आलेली आहे.सेंट्रल झु ऑथरिटी,नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनाअन्वये महानगरपालिका प्राणिसंग्रहालयातील अपुऱ्या जागेमुळे प्राण्यांच्या नैसर्गीक हालचालींवर बंधने येत असल्यामुळे प्राणिसंग्रहालयासाठी जागा वाढवणे व प्राणिसंग्रहालयाचा सुधारीत मास्टर प्लॅन तयार करणे आवश्यक आहे.

हे प्राणिसंग्रहालय मराठवाड्यातील एकमेव प्राणिसंग्रहालय असुन औरंगाबाद या ऐतीहासीक शहराचे पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण आहे.मागील वर्षी या प्राणिसंग्रहालयास सुमारे सात लक्ष दर्शकांनी भेट दिली व दरवर्षी दर्शकांची संख्या वाढत चालली आहे.प्राणिसंग्रहालयाचा मुख्य उद्देश दर्शकांचे मनोरंजन किंवा उत्पन्न वाढीचे साधन नसून दुर्मिळ वन्यजीव प्रजातीचे संरक्षण व संवर्धन आणि लोकांमध्ये वन्य प्राण्याविषयी माहिती व ज्ञान उपलब्ध करून देणे तसेच पर्यावरणाविषयी व अन्य प्राण्यांविषयी जनतेमधे जागृती निर्माण करणे असा उद्देश आहे व त्यानुसार महानगरपालिकेचे प्राणिसंग्रहालय काम करीत आहे.

या प्राणिसंग्रहालयात वन्य प्राण्यांच्या एकूण २१ प्रजाती असुन प्राण्यांची संख्या १५२ आहे. तसेच प्राणिसंग्रहालयात एक सर्पालय असून विविध प्रजातीच्या सर्पांची संख्या ८८ आहे. प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांच्या जाती व प्राण्यांची संख्या वाढल्यामुळे प्राणिसंग्रहालयाची जागा अपुरी पडत आहे.सध्या प्राणिसंग्रहालयात अपुऱ्या जागेमुळे क्षमतेपेक्षा जास्त असलेले प्राणी पांढरे वाघ-५, निलगाई-९,सांबर-२४,हरिन-१४ असे एकूण ५२ प्राणी अतिरीक्त आहेत.

प्राणिसंग्रहालय अधिक मोठया व प्रशस्त जागेत स्थलांतरीत करणेबाबत मा.न्यायमुर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापीत प्राणिसंग्रहालय सुधार समितीने शिफारस केली आहे.केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधीकरणाचे प्राणिसंग्रहालयास २०१० पर्यंत मान्यता दिलेली असून प्राण्यांचे नैसर्गीक हालचालींवर बंधने येऊ नयेत यासाठी वन्य प्राण्यांना अधिक प्रशस्त जागेत व नैसर्गीक जागेत व वातावरणात ठेवण्याबाबत सुचीत केलेले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने मिटमिटा येथील गट ३०७ मधील ४० हेक्टर जागा प्राणिसंग्रहालयासाठी शासनाकडे मागीतली होती.सदर जागेचे मुल्य शासनाने २९१ लक्ष ठरविले असुन तेथे प्राणिसंग्रहालय बी.ओ.टी.तत्वावर केल्यास जमिनीची किंमत शासनाचे ईक्वीटी पार्टीशिपेशन गृहीत धरून उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा शासनाचा राहील असे कळविले आहे.शासनाकडुन ही जमिन महसूल अधिनियम १९७१ अन्वये मोफत व महसूल मुक्त करून होणे बाबत म.न.पा.मार्फत प्रस्ताव सादर केला असुन शासनाकडून निर्णय झालेला नाही. तसेच सदर जागा ही उजाड माळरानं असुन नापीक आहे.त्यामुळे वन्य प्राण्यांना आवश्यक असणारी हिरवळ, झाडे,प्राण्यांना पोषक असे नैसर्गीक वातावरण निर्माण होण्यासाठी पुष्कळ कालावधी लागणार आहे. सदर जागा मुख्य रस्त्यापासून दूर आत असल्याने पर्यटकांसाठी गैरसोईचे आहे.त्यामुळे ही जागा प्राणिसंग्रहालयासाठी योग्य राहणार नाही.म्हणून पर्यायी जागेचाही शोध घेण्यात आला.

दिनांक २७/१/२००९ रोजी औरंगाबाद महानगरपालिका वन विभाग औरंगाबाद व अंधश्रृध्दा निर्मुलन समिती यांचे संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रभर काढण्यात येणाऱ्या सर्प विज्ञान प्रदर्शन कार्यक्रमाच्या दरम्यान मा.महापौर यांनी मा.वन मंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे समवेत चर्चेत प्राणिसंग्रहालय स्थलांतरीत करण्यासाठी वन विभागाची जागा उपलब्ध करून देण्या बाबत चर्चाकरून निवेदन देण्यात आलेले आहे.मा.वनमंत्री महोदयांनी सदर निवेदनावर मुख्य वनसंरक्षक,औरंगाबाद श्री सर्वेशकुमार यांनी जागेची त्वरीत पहाणी करून प्रस्ताव शासनाला त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश दिलेले होत.त्यानुसार वन विभागाचे अधिकारी व मनपाचे अधिकारी यांनी दौलताबाद घाटातील प्राणिसंग्रहालयासाठी योग्य वातावरण व पर्यावरण असलेल्या मोंबत्ता तलावाच्या बाजुची १०० हेक्टर जमिन पाहणी करून पसंद केली.त्यानुसार म.न.पा.मार्फत वनविभागास सदर जागा उपलब्ध करून देणे बाबत मुख्य वनसंरक्षक,प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांना वर मा.अतिरीक्त मुख्यसचिव, मंत्रालय,मुंबई यांना दिनांक २९/१/२००९ च्या पत्रान्वये औरंगाबाद म.न.पा. प्राणी संग्रहालयासाठी वनविभागाची सदर जागा उपलब्ध करून देणेबाबत विहित नकाशांसह प्रस्ताव सादर करण्यात आला होता.परंतु प्रस्तुत प्रकरणी मुख्य वनसंरक्षक,प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांनी दिनांक ७/२/०९ च्या पत्रान्वये **वन (संवर्धन)अधिनियम १९८० च्या अंतर्गत वन जमिनीचे वनेत्तर प्रयोजनासाठी प्रस्ताव तयार करणे,पुर्तता अहवाल सादर करणेबाबत सुचित केले आहे.**

परंतु औरंगाबाद म.न.पा.प्राणिसंग्रहालयासाठी लागणारी वन विभागाची जागा वनेत्तर प्रयोजनासाठी वापरली जाणार नसून वन विभागाच्या मुख्य उद्देशानुसार वन्य प्राण्यांचे संवर्धन,प्रजनन व पर्यावरणाबाबत लोकजागृती व लोकशिक्षण,दुर्मिळ होत चाललेल्या वन्य प्राण्यांचे संरक्षण,संवर्धन व प्रजनन करणे,अतिरीक्त असलेल्या प्राण्यांना मोकळया जागेत स्थलांतरीत करणे.तसेच कमी जागेमुळे हालचालींवर बंधने येत असलेल्या प्राण्यांना प्रशस्त व मोकळया जागेत स्थलांतरीत करणे व पर्यावरण संमृध्द करणे यासाठी वापरली जाणार आहे.असे पत्र म.न.पा.मार्फत दिनांक २५/३/०९ रोजी मुख्य वनसंरक्षक औरंगाबाद यांना देवून वन विभागाची जागा प्राणिसंग्रहालयासाठी उपलब्ध करून दिल्यास,जागतीक दर्जाचे प्राणिसंग्रहालय किंवा सफारीपार्क उभारला येईल व म.न.पा. प्राणिसंग्रहालयासाठी अपुऱ्या जागेमुळे निर्माण झालेली अडचण दूर होईल. असे कळविले आहे.

परंतु सदर प्रक्रियेस वन विभागाची जागा प्राणिसंग्रहालयासाठी उपलब्ध होण्यास दिर्घ कालावधी लागण्याची शक्यता आहे.आणि केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधीकरणाने प्राणिसंग्रहालयाच्या जागेचा सुधारीत मास्टर प्लॅन बनवुन सादर करण्यासाठी दिनांक ३१/३/२००९ पर्यंत मुदत दिलेली

होती. व मास्टर प्लॅन लवकर सादर करणेबाबत सेंट्रल झु ऑथरिटीकडून दिनांक १०/३/०८, ३०/४/०८,२/७/०८,५/८/०८,३/९/०८,१०/२/०९ च्या पत्रान्वये वारं-वार कळविण्यात आले आहे.परंतु योग्य जागा उपलब्ध होत नसल्यामुळे मुदतवाढ घेण्यात आली आहे.प्राणिसंग्रहालयास,सेंट्रल झु ऑथरिटीने ३० एप्रील २०१० पर्यंत मान्यता दिलेली असून सदर मान्यता पुढे चालु राहण्यासाठी त्यांनी सुचविलेल्या जागेच्या त्रुटी दूर करू व मानकाप्रमाणे मास्टर प्लॅन बनवुन मंजुरी घेणे व त्यानुसार प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांसाठी सुविधा वाढविणे व नैसर्गीक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**प्राणिसंग्रहालयाची मान्यता कायम राखण्यासाठी खालील प्रमाणे पर्याय आहेत.**

**१.**सध्या उपलब्ध असलेल्या जागेत वाढ करून सिध्दार्थ उद्यानाच्या बाजुने प्राण्यांच्या पिंजऱ्याची जागा केंद्रिय प्राणिसंग्रहालय,प्राधीकरणाच्या मानकानुसार वाढविणे आवश्यक आहे.त्यामुळे उपलब्ध आहे त्या म.न.पा.च्या जागेतच वाढ करून मास्टर प्लॅन बनवावा लागेल.व मंजुर प्लॅन नुसार बांधकामे करून घ्यावी लागतील.सदर कामांसाठी लागणारा निधी म.न.पा.च्या तरतुदींच्या प्रमाणात सेंट्रल झु ऑथरिटीकडून उपलब्ध होईल.

**२.**सिध्दार्थ उद्यानाच्या १४ हेक्टर जागेपैकी ०६ हेक्टर जागेवर प्राणिसंग्रहालय कार्यरत आहे.परंतु केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सुचनाअन्वये १० हेक्टर पेक्षा कमी जागा असेल तर अश्या प्राणिसंग्रहालयाला खंदक (मोट)असलेले पिंजरे व प्राणी वाघ,सिंह,हत्ती इत्यादी प्राणी ठेवण्यात येऊ नयेत.अशा सुचना आहेत.तसेच जानेवारी २००९ मधे पुणे येथे प्राणिसंग्रहालय अद्ययावत करण्याच्या कार्यशाळेत या प्राणिसंग्रहालयाची १४ हेक्टर जागा दाखवुनही सिंह कमी करण्याच्या सुचना दिल्या आहेत.त्यामुळे सिध्दार्थ उद्यानाची १४ हेक्टर जागा प्राणिसंग्रहालयासाठी उपलब्ध करून घेणेसाठी निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी प्राणिसंग्रहालयाची मान्यता कायम ठेवण्यासाठी व आहे त्याच ठिकाणी जागेत वाढकरून आधुनिक व दर्जेदार प्राणिसंग्रहालय बनविण्यासाठी **सेंट्रल झु ऑथरिटी नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनाअन्वये म.न.पा.प्राणिसंग्रहालयातील अपुऱ्या जागेमुळे प्राण्यांच्या नैसर्गीक हालचालींवर बंधने येत असल्यामुळे,प्राणिसंग्रहालयासाठी जागा वाढविणे व प्राणिसंग्रहालयाची सुधारीत मास्टरप्लॅन तयार करणे. व त्यानुसार अंमलबजावणी करणे बाबत मा.सभागृहात चर्चा होऊन निर्णय घेणे बाबत प्रस्ताव सादर.**

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :दोन वर्षापूर्वी अशाच प्रकारे प्रस्ताव मंजूर केला शासन व महापालिकेने जागेचा सर्वेही केला पुर्वी जो ठराव मंजूर झाला त्याचीच अमलबजावणी करावी पुन्हा प्रस्ताव का आला. |
| मा.महापौर | :सेन्ट्रंल झु ऑथरिटी कउून नियमीत पत्र येत आहे असे म्हटले पुर्वी प्रस्ताव झाला परंतु हा स्वयंस्पष्ट आहे प्रशासनाचे मत जाणून घेवू. |
| संचालक(प्रांणी संग्रहालय) | :प्रांणी संग्रहालयाचा मास्टर प्लॅन मार्च २००९ पर्यंत सेन्ट्रल झु ऑथरिटीकडे सादर करणे आवश्यक होते दोन वर्षापूर्वी जागा कमी पडत असल्यामूळे जागा स्थलांतराचे प्रपोजल होते ते सविस्तर आता ठेवले आहे |
| श्री.रेणुकादस वैद्य | :यापूर्वी प्रस्ताव मंजूर झाला किंवा नाही एवढाच खुलासा करावा |
| संचालक (प्रांणी संग्रहालय) | :मास्टर प्लॅन सादरच केलेला नाही जागा वाढविल्या शिवाय ते करता येणार नाही.सिध्दार्थ उदयानाचीच जागा वाढवावी लागेल जागा वाढविण्यासाठी पुष्कळ ठिकाणी प्रयत्न केले. |
| श्री.रेणुकास वैद्य | :२ वर्षापूर्वी १०० एकर जागेला मंजूरी दिली शासनाने सुध्दा मंजूरी दिली |
| संचालक (प्रांणी संग्रहालय) | : ती जागा महापालिकेच्या अदयाप ताब्यात आलेली नाही. |
| श्री.मुजीब खान | :उदयान मधील जागा कोणत्या बाजूकडून घेत आहे. |

संचालक (प्रांणी संग्रहालय) : उदयानच्या बाजूनेच जागा वाढवावी लागेल.

मा.महापौर :१०० एकर जागा मिळविण्यासाठी शासनाकडे काय कार्यवाही केली

संचालक (प्रांणी संग्रहालय) : मिटमिटा येथील गट नं.३०७ मधील ४० एकर जागा शासनाकडे मागविली होती शासनाने या जागेचे मुल्य २९१ लक्ष निश्चित केले सदर जागा मोफत व महसूल मूक्त देण्याचा प्रस्ताव केला होता शासनाकडून निर्णय नाही. त्या जागेवर प्रांणी संग्रहालय बीओटी तत्त्वावर केल्यास जमिनीची किंमत शासनाचा पार्ट गृहीत धरून उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा शासनाचा राहिल असे कळविले होते. शासनाकडून अधिनियम १९७१ अन्वये मोफत व महसूल मुक्त देणे बाबत प्रस्ताव सादर केलेला होता. शासनाकडून याबाबत निर्णय झालेला नाही. हि जागा माळरानात असून नापिक आहे तेथे झाडे, हिरवळ विकासासाठी मोठा खर्च लागणार आहे. मुख्य रस्त्यापासून मध्ये असून पाण्याचे सोर्सेस नसल्याने तितकीशी योग्य नाही म्हणून इतर ठिकाणच्या जागेचा शोध घेणे चालू होते.

सौ.लता दलाल :१०० एकरच्या जागेच्या संदर्भात शासनाचे जागा देत असल्याचे पत्र आले का तसेच लेणीच्या मागच्या बाजूला एक जागा महापालिकेने प्रस्तावित केली होती त्या बाबत शासनाचे पत्र आले का ?

श्री.रेणुकादास वैद्य शासनाने १०० एकर मिटमिटा येथील व लेणीच्या बाजूला जटवाडा रोडजवळील अशा दोन्ही जागेला मोफत देण्याची मंजूरी दिलेची माहिती आहे.

संचालक(प्रांणी संग्रहालय) :मोफत देण्या संदर्भात शासनाचे पत्र नाही. जमिनीची किमंत निश्चित केली ती भरावी असे आलेले आहे.

मा.महापौर :१०० एकर जागेचा प्रस्ताव दिला महापालिकेने पत्रव्यवहार केला होता या जागेच्या संदर्भात महापालिकेला काही पत्रव्यवहार केला का तपासावे.

संचालक(प्रांणी सग्रहालय) : जागा देणेच्या मान्यतेचे पत्र नाही सेंन्ट्रल झू ऑथरिटी कडून ३ महिण्यापासून प्रस्ताव तयार करण्यासाठी ८० हजार निधी प्राप्त झाला एकूण २ लक्ष प्रोजेक्ट तयार करण्यासाठी झु ॲथॉरिटीकडून मिळणार आहे जागा नसल्यामूळेच पूढील कार्यवाही केली नाही

श्री.मुजीब खान :उदयानची जागा यासाठी घेत आहे मुलांना खेळण्यासाठी जागा पाहिजे उदयानची जागा कमी करू नये.प्लॅन तयार केला सभागृहात सादर केला का?

संचालक (प्रांणी संग्रहालय) :प्लॅन तयार आहे. १० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.

मा.महापौर :कोणत्या बाजूने जागा घेणार आहेत त्या ठिकाणी काय विकास करणार स्पष्ट खुलासा करावा.

संचालक (प्रांणी संग्रहालय) :तेथे पार्टीशन किंवा मुळ स्ट्रक्चरमध्ये काहीही बदल करायचा नाही फक्त १० हेक्टर जागा ही प्रांणी संग्रहालयाची आहे असे एक दोन इनक्लोजर मोराचे घ्यायचे व शासनाकडून फंडस मिळावायचे.

श्री.गजानन बारवाल :प्रशासनाचा खुलासा समजला शासनाला सुचवायचे की जी जागा आहे ती भरपूर योग्य आहे. हरीण व सांबर संख्या जास्त आहे त्यातील कमी करून त्यातील जागा मिळू शकते नॉर्मस् प्रमाणे सध्या जागा उपलब्ध आहे. उदयानची जागा घेणेची किंवा प्राणी संग्रहालय वाढविण्याची गरज नाही.

श्री.मुजीब खान :उदयानची जागा कमी होवू नये.

मा.महापौर :.सांबर व हरीणाची संख्या कमी केल्यास तीही जागा मिळू शकेल अशी दुरूस्ती यात करावी प्रांणी संग्रहालयाची कोणतीही ॲक्टीव्हिटीज उदयान मध्ये सरकेल असे काम करू नये. मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सेंट्रल झु ॲथॉरिटी,नवि दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे प्राणी संग्रहालयासाठी जागा वाढविणे व प्राणी संग्रहालयाचा सुधारीत बृहत आराखडा तयार करणे यासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानाचा उद्देश व वापर न बदलता व यास सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय असे संबोधण्यास आणि प्राणी संग्रहालयासाठी पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत या जागेत प्राणी संग्रहालयाचा प्रलंबीत असलेला बृहत आराखडा तयार करून केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाकडून आराखडा मंजूर करून घेवून त्याची अंमलबजावणी करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५ :**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राकरीता सन २००८-०९ वर्षाकरीता पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेने तयार केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अ नुसार पर्यावरण अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर करण्यांत येत आहे.

करीता पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सन २००८-०९ मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मो.जावेद मो.इसहाक : शहरात कोणत्या भागात किती प्रमाणात प्रदुषण होते याचा उल्लेख यात नाही क्रांतीचौक,रेल्वेस्टेशन,बसस्टॅंड येथे कार्बन किती, सविस्तर यावे त्यानंतर मंजूरी देणे योग्य होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :दरवर्षी शासन नियमानुसार पर्यावरण अहवाल तयार होतो साधक बाधक चर्चा होते कार्यवाही होत नाही प्रस्ताव अवलोकनार्थ बघणे व वाचन करण्यासाठी आला त्याचा अभ्यास होईल यापूर्वी सभागृहात हा प्रस्ताव आला त्यावर योग्य सुचना दिल्यानंतर ही कोणतेही गांभीर्य न घेता, आहे तीच परीस्थिती आहे.यापूर्वीच्या बैठकीत यावर ज्या-ज्या सूचना केलेल्या आहे,त्याचीच अमलबजावणी प्रशासनाने करावी.तसेच प्रत्येक महापालिकेत पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करावे असे शासनाचे आदेश जीआर आहे अनेक महापालिकेत हे पद भरले याही महापालिकेत पद निर्माण करून भरण्यात यावे जेणे करून वर्षाच्या शेवटी प्रशासन आवश्यक उपाययोजना करून योग्य अहवाल सादर करू शकेल.

सौ.लता दलाल :यावर सविस्तर चचेसाठी वेळ लागेल २-३ महत्वाच्या मुद्ये बोलते सांडपाणी व कचऱ्यांची विल्लेवाट होणे आवश्यक आहे जुन्या सिव्हरेज लाईन फुटल्या नाल्यामध्ये ओपन पाणी वाहते त्यामुळे मोठे प्रदुषण व वातावरण प्रदुषीत होते राज्यात अनेक ठिकाणी स्वाईन फ्ल्युची लागण झाली या शहरातही काहींना लागण झाली पर्यावरणाच्या दृष्टीने या कडे लक्ष देण्याची गरज आहे वाहन प्रदुषण मोठया प्रमाणात होते. शहरात फुटपाथ केले त्याचा उपयोग पायी चालणारे व्यक्तीनी केला पाहिजे त्यास जाळया लावणे जे की कुणी वाहने उभी करणार नाही. यास तात्पुरती मान्यता देवू चालणार नाही यावर सविस्तर चर्चा व्हावी ज्या गोष्टी गांभीर्याने घ्यायच्या त्या घेवून योजना आखणी करावी.

श्री.प्रशांत देसरडा :अनेक नाल्यातील सिव्हर लाईन उघडयावर वाहतात त्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनेक लोक नाल्याच्या पाण्यावर भाजीपाला काढतात, तोच शहरात विक्रीस आणतात ही सत्य बाब आहे त्यामूळे तसेच अनेक ठिकाणी खाजगीतून पाणीपुरवठा होतो. अर्धे बोर नाल्यात,नाल्याच्या कडेला असलेल्या बोरमधील दुषित असते त्यामूळे नागरीकाचे आरोग्य पर्यायाने या शहरातील प्रदुषणाचा एक भाग आहे यासाठी ठोस कार्यवाही होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी नाला वळवून घेतला.चूकीचे आहे.शहरात पाण्यासाठी ४० लिटरचे कॅन वापरतो. त्याचे ३ ही प्लँट नाल्याचे बाजूला पिण्याच्या पाण्याचा वापर होतो.लग्नाच्यावेळी हे पाणी वापरतो. अनेक मोठे रस्ते शासन निधीतून तयार केले साईड नाली केलेली नाही त्या होणार आहे किंवा नाही खुलासा करावा.

श्री.संतोष खेंडके :नदी नाल्यामध्ये चांगले पाणी वाहण्या ऐवजी ड्रेनेजचे पाणी वाहतांना दिसून येते. यामूळे प्रदुषण निर्माण होते पुंडलिक नगर हुसैन कॉलनी, न्यायनगर,हनुमाननगर या भागात सिव्हर लाईन नसल्यामूळे अंतर्गत ड्रेनेज लाईन नागरीकांनी नाल्यात सोडल्या पाऊस पडल्यावर हे सर्व पाणी एकत्रितपणे लिगल भागात छत्रपतीनगर,कल्पतरू हौसींग सोसायटीमध्ये येते स्वाईन फ्ल्यु सारख्या आजाराची लागण होत आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने या सर्व बाबीकडे लक्ष देण्यात यावे.

श्री.विनायक पांडे :भावसींगपूरा भागाच्या बाजूलाच स्लाटर हॉऊस आहे मोठी दुर्गधी येते यासाठी त्वरीत कार्यवाही व्हावी.माझे वार्डात ३ नाल्यातून ड्रेनेजचे पाणी वाहते ईआयएस कार्यालयास नाल्याच्या बाजूचेच पाणी पुरवठा होतो पाणचक्कीसाठी जाणारी नहर खांबनदीतून नहरीच्या बाजूने मेन सिव्हरेज लाईन ती फुटलेली आहे तसेच विदयुत कॉलनी भागात नाल्यात सिव्हर लाईन सोडलेली आहे यामूळे वातावरण दुषित होते. मराठवाडा विदयापीठाच्या परीसरात अनेक विहिरी आहे त्या विहिरीला ड्रेनेजचे पाणी निचरा (पर्क्युलेशन) होते विद्यापीठ संबधीत सर्व अधिकारी कर्मचारी विद्यार्थी हेच पाणी पितात त्यासाठी प्रदुषीत पाणी थांबविण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :पर्यावरण या विषयाचे गार्भीय जेवढे समजेल तेवढे ते कमी आहे यापूर्वी विषय आलेला होता त्यावेळी ज्या सुचना केल्या त्यांचे अवलंब केला तरी पुरे होवू शकते पडेगाव कत्तलखाना कडून मोठी दुर्गधी सुटते बाजूला नागरीकांना त्रास होते याकडे तसेच शहरात नाले नदी यातून मोठे वायू प्रदुषण होते त्यासाठी उपाययोजना कराव्यात अनेक हातपंप व विहिरींना मोठया प्रमाणात दुषित पाणी आहे मेन लाईन सिव्हरेज लाईन हया योग्य ठिकाणी जोडल्या पाहिजे केंद्र शासनाने या बाबतीत काळजी घेण्याचे निर्देश दिले यासाठी आपल्या दालनात विशेष बैठकीचे आयोजन करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे प्रशासनाला निर्देश दयावेत.

श्री.मुजीब खान :पूर्ण शहरात कुठेही सिव्हर लाईन नाही.सिडको ते पंचायत समिती पर्यत टाकलेली होती ती नादुरूस्त झाली त्या संबधी अनेकदा तक्रार केली सर्वसाधारण सभेत दुरूस्ती करण्याला मंजूरी दिली कार्यवाही झाली नाही. नाल्याची खोली १०-१५ फुटापर्यत होती आता सध्या

नाल्यात ६-७ फुट गाळ व घाण साचलेली आहे म्हशीचे गोठे नाल्यावर जास्त प्रमाणात असून नाल्यात घाण सोडली जाते तसेच शहरातील मार्केट एकाच ठिकाणी असावे यामूळे मोठे प्रदुषण होत आहे.मच्छर माशा डासाचे प्रमाण वाढलेले आहे.तक्रार दिल्यानंतर १-२ तास काम करण्यासाठी येतात निघून जातात ८ तास काम करीत नाही.ज्यांना स्वच्छतेचे काम दिले त्यांचेकडून ते काम करून घ्यावे परंतु ५० टक्के कर्मचारी यांचे जागेवर कमी पगारावर खाजगी व्यक्ती देवून काम करून घेतात. बदली कर्मचाऱ्यांना १५००/- रूपये देतात. अशा पध्दतीने काम होत असेल तर स्वच्छता होणार नाही. प्रशासनाने झोन कार्यालयाकडे जबाबदारी दयावी सर्व कन्ट्रोमध्ये घ्यावे ताकीद दयावी स्वच्छतेचे काम चांगल्या रितीने हाती घ्यावे ४८ तासाच्या आत फवारणी होणार होती अदयाप माझे वार्डात फवारणीसाठी कुणीही आलेले नाही. प्रभाग कार्यालयास कन्ट्रोल करावे तरच केलेले नियोजन सफल होईल.

श्रीमती कला बोरामणीकर :वरद गणेश मंदीर जवळील नाल्यात हॉटेलचे विष्ठअन्न आणून टाकले जाते आठ दिवसापूर्वी तक्रार केली कार्यवाही झाली नाही नागेश्वरवाडी नाल्याच्या लगत म्हशीचा गोठा असून तेथे मोठी घाण साफसफाई होत नाही स्वाईन फ्यू सारखे आजार येत आहे १७ रूग्ण आढळले या बाबतीत कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :पर्यावरण म्हणजे नुसते घाण पाणी ड्रेनेज नव्हते तर परवानगी देतांना झाडे वगैरे लावणे स्वच्छता ठेवणे बाबतच्या सूचना ही दयाव्यात.

श्री.मुजीब खान :नाल्यावरील अतिक्रमण काढल्यास चांगल्या प्रकारे साफसफाई करता येईल.

मा.महापौर : पर्यावरणाच्या सद्यस्थितीच्या अहवालावर चर्चा केली. आपण जर बघितले तर शहरामध्ये वायु प्रदुषण,ध्वनी प्रदुषण, पाण्याचे प्रदुषण, या सभागृहातील सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे. या ठिकाणी अनेक सूचना आहे. त्यामध्ये नाल्याच्या ठिकाणी असलेली घाण अशा अनेक सूचना येथे स.सदस्यांनी मांडलेल्या आहे.स.सदस्यांनी आताच महत्वाची सूचना केल्याप्रमाणे नाल्यावर होणारे मोठे अतिक्रमण, त्याचप्रमाणे नाल्याची सफाई हा सर्वात मोठा विषय आहे. पूर्वी मोठमोठे असणारे नाले आता लहान स्वरूपात झालेले आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेता आपण अधिकाधिक काम हे पर्यावरणासाठी केलं पाहीजे. याबाबतीत ज्या-ज्या स.सदस्यांनी सूचना केल्या आहे,त्या लक्षात घेवून आपण महापालिकेनं काम करावं यापूर्वी पर्यावरण अहवालावर चर्चा झाली होती, त्याबाबतीतही केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी. एकंदरीतच महापालिकेच्या वेगवेगळ्या विभागाने काम करीत असतांना सुध्दा पर्यावरण संवर्धन करू शकतो.नगर रचना विभागामार्फत आपण जेंव्हा बांधकाम परवानगी देतो, तेंव्हाच झाडे लावायला सांगतो, अशाप्रकारे आपल्या ज्या अटी आहे, त्याबाबतीत पर्यावरणासंबंधी काही करू शकता येते का,याचाही आपण शोध घ्यावा आणि अधिकाधिक पर्यावरणासंबंधी जनजागृती करावी. आताच स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी सूचना केली की,इतर महापालिके मध्ये पर्यावरण संरक्षण अधिकारी हे पद आहे.त्याप्रमाणे माहिती घ्यावी, व अशाप्रकारे आपल्या

महापालिकेमध्ये सदरील पद भरले जाईल. अशाप्रकारे कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे पडेगांव व बेगमपुरा भागात जो त्रास होतो, हाडे उकळण्याचा जो कारखाना आहे, त्यामूळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.या बाबतीतही कार्यवाही करावी.अनेक गोठे नाल्याच्या काठी आहे ते शहराच्या बाहेर हलवावे. सिल्लेखाना हा शहरातील मध्य ठिकाणचा भाग असून तेथे अतिशय घाण व दुर्गंधी आहे त्याभागात स्वतः मा.आयुक्त यांनी भेट दिली होती परंतु त्या भागात स्वच्छता ठेवण्यामध्ये फारसा फरक पडलेला नाही.सिल्लेखाना हा भाग स्वच्छ होईल व शहरातील इतरही भागाच्या संदर्भात ज्या सुचना स.सदस्यांनी केलेल्या आहे त्याची प्रशासनाने अमलबजावणी करावी.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७-अ नुसार सन २००८-०९ वर्षाकरीता पर्यावरण स्थितीबाबतच्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शहरातील नाल्याचे मूळ स्वरूप अबाधित ठेवणे, यापूर्वीच्या पर्यावरण स्थितीबाबतच्या अहवालावर दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे, नियमित कामे करतांना पर्यावरण संवर्धनाची कामे करणे व यासंबंधी जनजागृती करणे, महापालिकेत पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद भरणे, हाडे उकळण्याच्या कारखान्यापासून आरोग्यास हाणी पोहचणार नाही तसेच सिल्लेखाना व शहराच्या इतर भागात दूर्गंधी राहणार नाही, याची दक्षता घेणे व इतर सूचनांसह प्रशासनातर्फे आवश्यक ती कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६ :**

सर्वसाधारण सभा दिनांक २३.०६.२००९ विषय क्र.५०८ च्या निर्णयाप्रमाणे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे इटखेडा, औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर ५७/१, ५७/२, ५७/३ मधील जमिनीतील ६० मीटर रूंद मंजुर विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्रसाठी हितसंबंधीत श्रीमती जीवनलता नंदकिशोर कागलीवाल व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार दिनांक १४.१२.२००५ रोजी प्राप्त अर्जान्वये खरेदी सूचना दिली आहे.

औरंगाबाद शहराची (वाढीव हद्द) मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार उक्त जमिनीतील जागा ६० मीटर रूंद पोच रस्त्यात बाधीत होत आहे. उक्त विकास योजना सन १९९१ मध्ये अंमलात आलेली असल्याने १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. उक्त कलम -१२७ मधील तरतुदी नुसार विकास योजना अंमलबजावणीच्या तारखेपासून १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने अर्जदाराने उक्त कलमाखाली दिलेली खरेदी सूचना लागू होते. त्यामुळे संबंधीतांनी कलम -१२७ च्या दिलेल्या खरेदी सूचनेनुसार रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

प्रकरणी संबंधीत अर्जदारांनी खेरदी सूचना देवून या विषयी आरक्षण (प्रस्तावित रस्ता) रद्द होणे करीता मा.उच्च न्यायालयात रिट याचिका देखील दाखल केलेली आहे. (रिट क्रमांक ६४५७/०६, औरंगाबाद खंडपीठ) त्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

करीता अर्जदाराने इटखेडा येथील सर्हे नंबर ५७/१, ५७/२, ५७/३ मधील खरेदी सूचने नुसारचे ६०.०० मीटर रूंद पैठण रस्त्याने बाधीत क्षेत्र खरेदी सूचनेनुसार संपादीत करावयाचे आहे.

करीता वरील प्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अहवाल..........**

**मौजे ईटखेडा येथील गट क्रमांक ५७/१ ते ३ साठी खरेदी सूचना**

मौजे ईटखेडा येथील गट क्रमांक ५७/१, ५७/२, ५७/३ हे ६०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत असून सदर विकास योजना ही सन १९९१ साली मंजूर झाल्याने तीला १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे.त्यामूळे सदर जमीनीचे मालक श्री.नंदकिशोर लक्ष्मीनारायण कागलीवाल

व इतर यांनी दिनांक १४.११.२००५ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये महानगरपालिकेवर खरेदी सूचना बजावली आहे. त्यांनी सदर खरेदी सूचना ही ॲड.वंदना टाकळकर यांचेमार्फत बजावली.

मात्र सदर खरेदी सूचने बरोबर त्यांनी मालकी हक्काचे व पर्यायाने या जमीनीतील त्यांचे हक्काचे कोणतेही कागदपत्र जोडले नव्हते म्हणून दिनांक ०६.०३.२००६ रोजी तत्कालीन सहाय्यक संचालक,नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी सदर जागेसाठी श्री.कागलीवाल यांना जा.क्र./मनपा/नरवि/ससनर/भूस/३७५/२००६ अन्वये पत्र देवून त्रुटीची पूर्तता करणे बद्दल व पूर्तता केल्यानंतर त्या तारखेपासून खरेदी सूचनेचा कालावधी मोजला जाईल, अशा आशयाचे पत्र दिले.

मात्र श्री.कागलीवाल यांनी उपरोक्त पत्रात सूचविल्याप्रमाणे पूर्तता न करता मा.उच्च न्यायालयात धाव घेतली व आपली जागा आरक्षण मूक्त करावी अशी मागणी केली. (रिट पिटीशन क्र.६४५७/२००६) सदर याचिकेच्या सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्याचे वकिल श्री.सोमण यांनी ७/१२ उताऱ्याच्या प्रती महानगरपालिकेत दाखल करू असे सांगितल्यावर महानगरपालिकेचे विधिज्ञ श्री.पगारे यांनी अर्जदाराने कागदपत्र दाखल केल्यावर महानगरपालिका कार्यवाही करेल. व पूढील सुनावणी व त्याबद्दल अहवाल देईल, असे Statement केले व त्याआधारे विधी सल्लागार, महानगरपालिका औरंगाबाद यांनी पत्र क्र.मनपा/विधी वि/३५५/२००९ दि.२४.०४.२००९ अन्वये नगर रचना विभागात अर्जदार यांनी ७/१२ उतारा दाखल केला का? सादर केला असल्यास त्यावर नगर रचना विभगाने काय कार्यवाही केली. हे विधी विभागास दिनांक २८.०४.२००९ पर्यंत कळवावे असे पत्र दिले. अर्जदार यांनी दिनांक ०८.०५.२००९ रोजी कागदपत्र दाखल केल्याने मा.सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव सादर केला आहे.

सदर ६०.०० मी.रूंद विकास योजना रस्ता म्हणजे औरंगाबाद -पैठण रस्त्याचा भाग होणार असून विकास योजनेत या रस्त्याची आखणी (Alighment) बदलून ती सरळ करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामूळे सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यापेक्षा वेगळी ही आखणी आहे.

सदर सुधारीत आखणीत प्रस्तावित गट क्र.५७/१ ते ३ शिवाय गट क्र.६४ व ६५ चा काही भागही बाधीत होणार आहे. तूर्त गट क्र.५७/१ ते ३ साठी भूसंपादन प्रस्ताव आहे. त्यास साधारणत: ४२०० चौ.मी.एवढे क्षेत्र बाधीत होत असून महानगरपालिकेचे प्रचलित पध्दतीनुसार त्यासाठी रक्कम रूपये १,०७,००,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. मात्र संयुक्त मोजणी व त्याआधारे भूसंपादन अधिकारी यांचे मुल्यांकन त्यामूळे क्षेत्र व मोबदला यात बदल संभवतो.तरी अहवाल सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :यात असे म्हटले की न्यायालयात रिट पिटीशन झालेले आहे. त्यासाठी न्यायालयाचे जे निर्देश येतील त्याचा मान ठेवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :मा.न्यायालय जे निर्णय घेईल ते मान्य राहिल आपण निर्णय घेवू नये. |
| मा.महापौर | :या विषया संबधी कोर्ट मॅटर असल्यामूळे कोर्टाच्या अधीन हा विषय असल्यामूळे स्थगिती देण्यात येते. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | :१२७ ची नोटीससंबंधी प्रस्ताव ताबडतोब येतात.अधिकाऱ्यांना विचारावे. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी मा.न्यायालयात मॅटर असल्यामूळे,सदरील प्रस्तावास स्थगिती देण्यांत आली.

**<u>विषय क्र. ५७७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, समर्थनगर येथील मालजीपुरा भागातील विहीरीची गेल्या अनेक वर्षापासून साफसफाई करण्यात आलेली नसून सदरील विहीरीतील पाण्याचा वापर नागरीक मोठ्या प्रमाणात करत आहे. तथापी येथील नागरीकांनी विहीरीची साफसफाई करून विद्युत पंप बसविण्याची मागणी केलेली आहे.

करीता सदरील विहीरीतील गाळ काढून त्यावर विद्युत पंप बसविण्याच्या कामासाठीचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.कला सुरेश बोरामणीकर　　अनुमोदक : श्री.विनोद सोनवणे

मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर येथील मालजीपुरा भागातील विहीरीतील गाळ काढून त्यावर विद्युत पंप बसविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, समर्थनगर येथील सावरकर चौक ते सिल्लेखाना सिग्नल पर्यंत जाणाऱ्या रस्त्यास सावरकर प्रेमी कै.दादा पुराणीक मार्ग असे नांव देण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरीकांकडून होत आहे.

करीता नागरीकांच्या मागणीचा विचार करता सावरकर चौक ते सिल्लेखाना सिग्नल पर्यंत जाणाऱ्या रस्त्यास सावरकर प्रेमी कै.दादा पुराणीक मार्ग असे नांव देण्यात यावे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.कला सुरेश बोरामणीकर,श्री.गजानन रामकिशन बारवाल

अनुमोदक : श्री.विनोद सोनवणे

मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर येथील सावरकर चौक ते सिल्लेखाना सिग्नल पर्यंत जाणाऱ्या रस्त्यास सावरकर प्रेमी कै.दादा पुराणीक मार्ग असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगपुरा सरस्वती भुवन शाळेसमोरील बस थांब्या जवळील झुणकाभाकर केंद्रालगतच्या मनपाची १२ बाय २० आकाराची खुली जागा नोंदणीकृत समर्थ सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेस नाममात्र भाडे तत्वावर देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.विनोद सोनवणे　　अनुमोदक : सौ.कला बोरामणीकर

मा.महापौर　　: या विषयाच्या बाबतीत महापालिकेकडे संबंधीत विभाग आहे, त्या विभागाकडे मागणी करता येवू शकते. जर नियमानुसार जागा असेल तर देता येवू शकते संबंधीत विभागास मागणी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा सरस्वती भुवन शाळेसमोरील बस थांब्या जवळील झुणकाभाकर केंद्रालगतच्या मनपाची १२ बाय २० आकाराची खुली जागा नोंदणीकृत समर्थ सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेस नाममात्र भाडे तत्वावर देण्यासाठी या बाबतीत महापालिकेकडे संबंधीत विभाग आहे, त्या विभागाकडे मागणी करता येवू शकते. जर नियमानुसार जागा असेल तर देता येवू शकते संबंधीत विभागास मागणी करावी. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पदमपुरा येथील मोची मोहल्ला कॉर्नर ते लक्ष्मीवाडी पर्यंतच्या मुख्य रोडला कै.श्री.रामलाल माहोरे मार्ग असे नांव देण्यासाठी नागरीकांची मागणी होत आहे. करीता मोची मोहल्ला कॉर्नर ते लक्ष्मीवाडी पर्यंतच्या मुख्य रोडला कै.श्री.रामलाल माहोरे मार्ग असे नाव देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.डॉ.भागवत कराड　　अनुमोदक : श्री.विनोद सोनवणे

मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा येथील मोची मोहल्ला कॉर्नर ते लक्ष्मीवाडी पर्यंतच्या मुख्य रोडला कै.श्री.रामलाल माहोरे मार्ग असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,पदमपुरा येथील लक्ष्मीवाडी चौकास कै.श्री.शेकुलालजी बारवाल (काका) असे नाव देण्यासाठी नागरीकांची मागणी होत आहे. करीता लक्ष्मीवाडी चौकास कै.श्री.शेकुलालजी बारवाल(काका)चौक असे नांव देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.डॉ.भागवत कराड		अनुमोदक : श्री.विनोद सोनवणे

मा.महापौर		: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा येथील लक्ष्मीवाडी चौकास कै.श्री.शेकुलालजी बारवाल (काका) असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सहयोग अपंग बहुउद्देशीय संस्था संचलित अभिनव बालक मंदिर,साहस सोसायटी,गारखेडा परिसर औरंगाबाद यांनी संदर्भिय विनंती अर्जाद्वारे कळविले आहे की, साहस सोसायटीच्या पश्चिमेस खुल्या जागेवर मनपाने संरक्षक भिंत बांधली असून रेखाकंना प्रमाणे त्रिकोणी खुली जागा शिल्लक आहे. ह्या जागेवर वेळोवेळी अतिक्रमण होण्याचा प्रयत्न झाला परंतू सोसायटीतील सतर्क नागरीकांनी ती जागा रिकामी केली. सदर जागा सहयोग अपंग बहुउद्देशिय संस्था संचलित अभिनव बालक मंदिर यांना बालक मंदिर चालविण्यास देण्याचा ठराव सोसायटीने पारीत केला.

याबाबत शासनाने अपंगासाठी असलेल्या संस्थेस सवलतीच्या दराने जागा भाडे तत्वावर देण्याचा शासन निर्णय काढला आहे.

करीता सदरील खुली जागा सहयोग अपंग बहुउद्देशिय संस्था संचलित अभिनव बालक मंदिर यांना बालक मंदिर चालविण्यास देण्यासाठी प्रस्ताव सर्वानुमते मंजूरीस्तव सादर.

सुचक :श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.भागवत कराड		अनुमोदक :श्री.विनोद सोनवणे

मा.महापौर		: महापालिकेकडे यासाठी संबंधीत विभाग आहे,त्या विभागाकडे तशी मागणी करावी नियमात बसत असेल तर जागा देता येवू शकेल, त्याकरीता संबंधीत विभागाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहयोग अपंग बहुउद्देशीय संस्था संचलित अभिनव बालक मंदिर, साहस सोसायटी,गारखेडा परिसर औरंगाबाद यांना साहस सोसायटीच्या पश्चिमेस असलेल्या खुल्या जागेवर मनपाने संरक्षक भिंत बांधली असून रेखाकंना प्रमाणे त्रिकोणी खुली जागा शिल्लक असल्यामूळे, सदर जागा संस्थेस बालक मंदिर चालविण्यास सवलतीच्या दराने देण्यासाठी महापालिकेकडे यासाठी संबंधीत विभाग असून, त्या विभागाकडे तशी मागणी करावी नियमात बसत असेल तर जागा देता येवू शकेल, त्याकरीता संबंधीत विभागाने कार्यवाही करावी. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातून सिंदखेडराजाच्या दिशेने जाणाऱ्या बीड बायपास रोडवरील केंब्रिज शाळेजवळील चौकास अद्याप कोणाचे नांव दिलेले नाही. याच चौकातून दरवर्षी १२ जानेवारील लाखो जिजाऊ प्रेमी सिंदखेड राजाला जात असतात करिता सदरील चौकास **राष्ट्रमाता जिजाऊ** असे नांव देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय उत्तमराव जगताप		अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातून सिंदखेडराजाच्या दिशेने जाणाऱ्या बीड बायपास रोडवरील केंब्रिज शाळेजवळील चौकास राष्ट्रमाता जिजाऊ असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पदमपुरा येथील नविन वस्ती जवळील चौकास मैत्रेय चौक असे नांव देण्यासाठी नागरीकांची मागणी होत आहे. करीता नविन वस्ती जवळील चौकास मैत्रेय चौक असे नांव देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल अनुमोदक : श्री.सतिष कटकटे,श्री.विजय खुडे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा येथील नविन वस्ती जवळील चौकास मैत्रेय चौक असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कैसर कॉलनी मनपा आरोग्य केंद्राचे नांव हझरत निजामोद्दीन मनपा आरोग्य केंद्र कैसर कॉलनी असे नामकरण करण्यात यावे. कारण की,कैसर कॉ. येथील नागरीकांच्या भावनालक्षात घेता हेकाम करणे जरूरी आहे.प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे सादर.

सुचक : श्री.सलिम पटेल अनुमोदक : श्री.कैसर खान

**संवाद :**

श्री.मो.जावेद मो.इसाक : हा विषय मंजूर करावा.

श्री.सलीम पटेल : आपेनस्पेस पैकी १० टक्के जागा गोल्डन हेल्थ क्लब यांना देण्यात यावी ते फक्त ग्राऊड पलोअर बांधणार होते. असा ठराव १९९३ ला मंजूर झाला होता तेथे जागा त्यांना दिली नाही हॉस्पीटल झालेले आहे १९९३ साली उदघाटनाच्या वेळी त्यास ओरली काहीतरी नाव दिले होते त्यास सभागृहाची मान्यता नाही म्हणून त्यास हजरत निजामोद्यीन हे नाव देण्यात यावे.

श्री.मुजीब खान : १९९३ साली दवाखाना झाल्यानंतर यास नाव देण्याबाबत ठराव झालेला आहे. पुन्हा त्याच वास्तुला नाव देण्याचा हा दुसरा प्रस्ताव आलेला आहे.नाव देण्याचा ठराव झाला त्यावेळी मी या सभागृहाचा सदस्य होतो. माजी नगरसेवक श्री.मोहसीन अहमद यांनी ठराव मांडला होता

मा.महापौर : या अगोदर जर नाव दिलेले नसेल तर नाव देण्यास हरकत नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : व्यक्तिगत नाव देण्यापेक्षा संताची नावे दिल्यास योग्य वाटते.

श्री.सलीम पटेल : नगरसेवकांचे आई, वडिल यांचे नाव देणे चुकीचे आहे. यापुर्वी नाव दिलेले असेल तरी ते बदलण्याचा अधिकार सभागृहाला आहे जे संत आहे जेष्ठ नागरीक होते त्यांचे नाव दिलेले चांगले.

श्री.मुजीब खान :१९९३ ला ठराव झाला होता

मा.महापौर : नांव देण्याचे ठरावाच्या बाबतीत आपण सर्वांनी मिळूनच मार्ग काढला पाहिजे. कारण रूलींग देण्यास अडचण येते. यापूर्वी नाव दिलेले आहे का हे तपासून घ्यावे नसेल तर नाव देण्यास हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कैसर कॉलनी मनपा आरोग्य केंद्राचे नांव हझरत निजामोद्दीन मनपा आरोग्य केंद्र कैसर कॉलनी असे नामकरण करण्यासंबंधी

यापूर्वी नांव दिलेले आहे का हे तपासून घ्यावे नांव दिलेले नसेल तर नांव देण्यास हरकत नाही, असे सर्वानुमते ठरले, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासनाने पत्र क्र.नगर विकास विभाग क्र.एएमसी २९२०२/१०९/प्र.क्र.७/नवि-२४ दिनांक ८.१.२००४ रोजी कळविले आहे की, ज्या अनाधिकृत वसाहती गुंठेवारी अधिनियमाखाली नियमाधीन होवू शकतील अशा वसाहती मधील नागरी सुविधांच्या देखभालीची अत्यावश्यक कामे उदा.स्ट्रीट लाईटची गेलेली ट्युब/लॅम्प बसविणे, पाणी पुरवठा लाईन्सची गळती, तुंबलेल्या मलनिस्सारण वाहीनीची दुरूस्ती इत्यादी कामे करण्यास हरकत नाही. मात्र अशा वसाहतीमध्ये नव्याने सुविधा पुरविणेची कामे जशा जशा वस्त्या नियमाधीन होतील व त्यामधून प्रशमन शुल्काची रक्कम जशी जशी जमा होईल त्या प्रमाणात करावीत. असे आदेश शासनामार्फत प्राप्त झाले. सध्या महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रात आमदार व खासदार यांच्या स्थानिक विकास निधीतून कामे करण्यात येतात. काही स.नगरसेवक/नगरसेविका यांचा संपूर्ण प्रभाग हा गुंठेवारी क्षेत्रात येते आहे. त्यामूळे त्यांना त्यांच्या प्रभागात विकासाची कामे करता येत नाहीत. त्यातच महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रात आमदार व खासदार यांचा निधी वापरता येत असल्यामूळे, त्या भागातील स.नगरसेवकांनी तसेच इतरही नगरसेवक/नगरसेविकांनी त्यांचा स्वेच्छा निधी गुंठेवारी क्षेत्रात वापरता यावा म्हणून अंमलबजावणीच्या अटीतील अट क्र.४ परवानगी ३१ मार्च २००९ पर्यंतच्या ऐवजी ३१ मार्च २०१० पर्यंतचा कालावधी वाढवून देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.रविंद्र गांगे,श्री.संतोष खेंडके पाटील		अनुमोदक :सौ.रेखा काथार,श्री.नारायण कुचे

मा.महापौर		: हा विषय मंजूर करण्यात येतो.प्रशासनाला निर्देश देण्यात येते की ज्या पध्दतीने गुंठेवारी भागात खासदार आमदार निधी व शासनाचा निधी येतो तो खर्च करता येतो नगरसेवक ज्या भागातून निवडून येतात त्यांना त्या भागात काम करणे आवश्यक असते.एकीकडे शासन गुंठेवारी भागात महापालिकेला निधी वापरण्यास प्रतिबंध करते दुसरीकडे तेच शासन विशेष निधी देवून गुंठेवारी भागात काम करते त्याच धरतीवर अशा भागात नगरसेवक निधीतून विकास कामे व्हावीत याची प्रशासनाने अमलबजावणी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रात आमदार व खासदार यांचा निधी वापरता येत असल्यामूळे, त्या भागातील स.नगरसेवकांनी तसेच इतरही नगरसेवक/नगरसेविकांनी त्यांचा स्वेच्छा निधी गुंठेवारी क्षेत्रात वापरता यावा म्हणून अंमलबजावणीच्या अटीतील अट क्र.४ परवानगी ३१ मार्च २००९ पर्यंतच्या ऐवजी ३१ मार्च २०१० पर्यंतचा कालावधी वाढवून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पामध्ये गट नं.१९ कांचनवाडीमध्ये राज्य शासनाचा विशेष उपक्रम म्हणून राजे संभाजी भोसले सैनिकी निवासी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना सैनिकी प्रशिक्षण देण्यात येते. परंतू सदरील शाळेत विद्यार्थ्यांसाठी मनपाकडून कोणतीही मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिलेली नसल्याने त्यांची फार मोठी गैरसोय होत आहे.

करीता भावी सैनिक विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात ड्रेनेज,विद्युत,रस्ते,अत्यंत आवश्यक असलेली मुलभूत सुविधा करून देण्यासाठी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तसेच ड्रेनेज,विद्युत,रस्ते,जलवाहीनी व इतर कामे करण्यासाठी चा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.घोडेले अनिता नंदकुमार		अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गट नं.१९ कांचनवाडीमधील राजे संभाजी भोसले सैनिकी निवासी शाळेच्या परिसरामध्ये ड्रेनेज,विद्युत,रस्ते,जलवाहीनी व इतर कामे करण्यासाठी अर्थसंकल्प सन २००९-२०१० मध्ये ठेवलेल्या तरतूदीनुसार सदर कामे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२३ मसनतपुर येथील जलवाहीनी खराब झाली आहे. त्यामूळे तेथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत आहे. करीता प्रभाग क्र.२३ मसनतपुर येथे जलवाहीनीच्या कामासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मध्ये ५२ लक्ष रू. ची तरतूद करण्यात आली आहे.

करीता जलवाहीनीचे काम त्वरीत चालू करण्यात यावे, यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव मा.सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्रीमती मीराताई शिंदे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२३ मसनतपुर येथे जलवाहीनीच्या कामासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मध्ये र.रू.५२.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली असल्यामूळे, सदरील काम त्वरीत चालू करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.०६ मधील अर्थसंकल्पात ढिंबरगल्ली मनपाच्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्यासाठी एससीआर-ए-२ अ.क्र.२ वर ५ लक्ष तरतूद ठेवण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी अंदाजपत्रक तयार झाले असून त्यामधील उर्वरीत रक्कम ३.४० लक्ष शिल्लक असल्याने उर्वरीत रक्कमेत वार्ड क्र.६ बेगमपुरा येथे आर.सी.सी.कमान बांधण्यासाठी वळती करून सदरील काम करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.विनायक प्रभाकरजी पांडे अनुमोदक : सौ.लता दलाल, श्री.संतोष खेंडके पाटील

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०६ करीता अर्थसंकल्पात ढिंबरगल्ली मनपाच्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्यासाठी एससीआर-ए-२ अ.क्र.२ वर ५ लक्ष तरतूद ठेवण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी अंदाजपत्रक तयार असून त्यामधील उर्वरीत रक्कम ३.४० लक्ष शिल्लक असल्याने उर्वरीत रक्कमेत वार्ड क्र.६ बेगमपुरा येथे आर.सी.सी.कमान बांधण्यासाठी वळती करून सदरील काम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.०६ मधील विविध कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद ठेवण्यात आलेले होती, परंतू सदरील विद्युत कॉलनी नाला दुरूस्ती करण्यासाठी ठेवण्यात आलेले तरतूद अपुरी पडत असल्याने खालील लेखाशिर्षकातील तरतूद मधील कामात वळती करून सदरील काम करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र. | लेखाशिर्षकातील कामाचे विवरण | सुधारीत काम |
|---|---|---|
| ०१. | १. वार्ड क्र.०६ तीन देवी मंदिर मनपा खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणेसाठी अर्थसंकल्प पान क्र.एससीआर-ए-२ वर ५ लक्ष<br>२. वॉर्ड क्र.६ विद्युत कॉलनी नाला दुरूस्ती करणेसाठी अर्थसंकल्प पान क्र.एससीआर ए-३ वर ५ लक्ष | वॉर्ड क्र.६ विद्युत कॉलनी नाला दुरूस्ती करणेसाठी १५ लक्ष ठेवणे बाबत. |

| | | |
|---|---|---|
| | ३. वार्ड क्र.६ मध्ये विविध ठिकाणी नाले दुरूस्ती करणे. पान क्र.एससीआर ए-३ वर ५ लक्ष | |

सुचक : श्री.विनायक प्रभाकरजी पांडे　　अनुमोदक : सौ.लता दलाल,श्री.संतोष खेंडके पाटील
मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०६ मधील विविध कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | लेखाशिर्षकातील कामाचे विवरण | सुधारीत काम |
|---|---|---|
| ०१. | १. वार्ड क्र.०६ तीन देवी मंदिर मनपा खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणेसाठी अर्थसंकल्प पान क्र.एससीआर-ए-२ वर ५ लक्ष<br>२. वॉर्ड क्र.६ विद्युत कॉलनी नाला दुरूस्ती करणेसाठी अर्थसंकल्प पान क्र.एससीआर ए-३ वर ५ लक्ष<br>३. वार्ड क्र.६ मध्ये विविध ठिकाणी नाले दुरूस्ती करणे. पान क्र.एससीआर ए-३ वर ५ लक्ष | वॉर्ड क्र.६ विद्युत कॉलनी नाला दुरूस्ती करणेसाठी १५ लक्ष ठेवणे बाबत. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.३० हर्षनगर येथे मनपाची जागा उपलब्ध नसल्याने ग्रंथालय व व्यायाम शाळेची मागणी नागरीकांकडून होत आहे.

तरी ग्रंथालय व व्यायाम शाळेसाठी खाजगी जागा भाडे तत्वावर उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे. तरी सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

सुचक : सौ.शोभा मिटकर,श्री.गजानन रामकिशन बारवाल
अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.विनोद सोनवणे
मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३० हर्षनगर येथे ग्रंथालय व व्यायाम शाळा चालविणेसाठी महानगरपालिकेची जागा उपलब्ध नसल्याने खाजगी जागा भाडे तत्वावर उपलब्ध करून देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सोनामाता हायस्कुल ते पवार हॉस्पिटल पर्यंत रस्त्याचे अहिंसा मार्ग असे नामकरण करण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.भगवान घडमोडे
अनुमोदक :श्री.प्रशांत देसरडा, श्री.महेश माळवतकर
मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सोनामाता हायस्कुल ते पवार हॉस्पिटल पर्यंत रस्त्यास अहिंसा मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत गुंठेवारी तसेच अनाधिकृत वसाहती असून या वसाहती मध्ये अनेक नागरी सुविधा पुरविणे अत्यावश्यक आहे. तथापी या वसाहतीमध्ये या सुविधा उपलब्ध करून देणे स.सदस्यांना शक्य होत नाही. महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी तसेच अनाधिकृत वसाहतीमध्ये विशेष अनुदानातून आणि आमदार,खासदार यांच्या स्वेच्छा निधीतू विविध विकास कामे करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुषंगाने औरंगाबाद शहरातील विविध गुंठेवारी भागात तसेच अनाधिकृत वसाहतीमध्ये स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधून विकास कामे करण्यास परवानगी दिल्यास या वसाहतींना नागरी सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल. तरी स.सदस्यांच्या

स्वेच्छा निधी मधून गुंठेवारी भागात तसेच अनाधिकृत वसाहतीमध्ये विविध विकास कामे करण्यासाठी स्वेच्छा निधी वापरण्यास परवानगी देण्यात यावी, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक:श्री.गजानन रामकिशन बारवाल    अनुमोदक :श्री.शंशाक दामोधर विसपुते,श्री.भाऊसाहेब ताठे

मा.महापौर    :हा विषय ५८६ प्रमाणे आहे त्यावर घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी तसेच अनधिकृत वसाहतीमध्ये शासनाचे विशेष अनुदानातून आणि मा.आमदार,मा.खासदार यांच्या निधीतून विकास कामे करण्यास परवानगी दिलेली असल्याने त्याच धरतीवर औरंगाबाद महानगरपालिकेतील पालिका सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून गुंठेवारी भागात आणि अनाधिकृत वसाहतीमध्ये विविध विकास कामे करण्यासाठी मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४ :**

औरंगाबाद मनपामध्ये काही ठिकाणी बरेच मनपा मालकीचे गाळे तशीच आहेत. त्यापैकी काही गाळे मनपाच्या मालकी असलेले मिर सलामी मार्केटमध्ये आहेत. त्यातील एक गाळा पत्रकार विक्रेता संघटना यांना कार्यालय म्हणून मनपाच्या नियमानुसार कमीत कमी भाडे तत्वावर द्यावेत.

सुचक : डॉ.भागवत कराड

अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.शशांक दामोधर विसपुते,श्री.भाऊसाहेब ताठे

मा.महापौर    : संबधीत विभागाकडे मागणी करावे नियमानुसार त्या विभागाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मनपामध्ये काही ठिकाणी बरेच मनपा मालकीचे गाळे तशीच असल्यामूळे, त्यापैकी काही गाळे मनपाच्या मालकी असलेले मिर सलामी मार्केटमध्ये असून त्यातील एक गाळा पत्रकार विक्रेता संघटना यांना कार्यालय म्हणून देण्यासाठी संबंधीत विभागाकडे मागणी करणेस व नियमानुसार संबंधीत विभागाने कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-११ वार्ड क्र.३ नवनाथनगर येथील पाण्याच्या टाकीचे काम प्रगती पथावर आहे. व या टाकीत पाणी घेण्यासाठी मेनरोड पासून टाकीपर्यंत व टाकीतून प्रभागात वितरण करण्यापर्यंत पाण्याची लाईन टाकण्यासाठी शासनाकडून किंवा मनपा फंडातून निधी उपलब्ध करून दिल्यास सदरील काम करणे शक्य होईल व नागरीकांचा पाण्याचा प्रश्न मिटेल, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब ताठे,डॉ.भागवत कराड

अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.शशांक विसपुते

मा.महापौर    : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-११ वार्ड क्र.३ नवनाथनगर येथील पाण्याच्या टाकीचे काम प्रगती पथावर असल्यामूळे, व या टाकीत पाणी घेण्यासाठी मेनरोड पासून टाकीपर्यंत व टाकीतून प्रभागात वितरण करण्यापर्यंत पाण्याची लाईन टाकण्यासाठी शासनाकडून किंवा मनपा फंडातून निधी उपलब्ध करून देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दि.०२.०३.२००९ विषय क्र.४६१ अन्वये सिडको एन-४ हनुमान मंदिरा समोरील सिडकोने २००४ मध्ये बुजविलेली बारव परमार्थ सांस्कृतिक

मंडळास विनामुल्य देखरेख व संगोपनास जुलै २००६-२०१० पर्यंत देण्यांत आली होती. याच सेवाभावी संस्थेस पूढील १० वर्षाकरीता सिडको प्रशासनाच्या अटी व शर्तीवर नियमानुसार विनामुल्य देण्यास व रितसर बांधकाम परवानगी घेवूनच विकास करण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावात पूढील १० वर्षाकरीता ऐवजी पूढील ६० वर्षाकरीता देणेसाठी सुधारीत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती जयश्री किवळेकर अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दि.०२.०३.२००९ विषय क्र.४६१ अन्वये सिडको एन-४ हनुमान मंदिरा समोरील सिडकोने २००४ मध्ये बुजविलेली बारव परमार्थ सांस्कृतिक मंडळास विनामुल्य देखरेख व संगोपनास जुलै २००६-२०१० पर्यंत देण्यांत आली होती. याच सेवाभावी संस्थेस पूढील १० वर्षाकरीता सिडको प्रशासनाच्या अटी व शर्तीवर नियमानुसार विनामुल्य देण्यास व रितसर बांधकाम परवानगी घेवूनच विकास करण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावात पूढील १० वर्षाकरीता ऐवजी पूढील ६० वर्षाकरीता देणेच्या सुधारीत प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५९७ :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मो.जालना रोड क्रांतीचौक उड्डाण पुलाच्या कामात बाधीत होणारी ७०० मी.मी.व्यासाची सीआय व ४०० मी.मी.व्यासाची एमएस जलवाहीनी बंद करून स्थलांतरीत करून नविन ७०० मी.मी.व्यासाची डी.आय.के.-९ व ४०० मी.मी. व्यासाची एमएस जलवाहीनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३३,३३,४००/- चे तयार करण्यात आलेले असून सदरील कामाचा खर्च सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात पाणीपुरवठा व देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षकातून करण्यात येईल. सदरील कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३३,३३,४००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव तसेच अर्थसंकल्प २००९-२०१० च्या पाणीपुरवठा देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षकातून काम करणेस तरतूद उपलब्धीसह मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.जालना रोड क्रांतीचौक उड्डाण पुलाच्या कामात बाधीत होणारी ७०० मी.मी.व्यासाची सीआय व ४०० मी.मी.व्यासाची एमएस जलवाहीनी बंद करून स्थलांतरीत करून नविन ७०० मी.मी.व्यासाची डी.आय.के.-९ व ४०० मी.मी. व्यासाची एमएस जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रूपये ३३,३३,४००/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरील कामाचा खर्च सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात पाणीपुरवठा व देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षकातून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद